प्रति
मा. प्राचार्य,
राष्ट्रीय सेवा योजना कार्यरत असलेली सर्व संलग्न महाविद्यालये
(पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा)

**विषय** : सन २००५–२००६ साठी जिल्हास्तरीय, विद्यापीठ, राज्यस्तरीय व इंदिरा गांधी राष्ट्रीय पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविणेसंबंधी.

महोदय,

दरवर्षीप्रमाणे सन २००५–२००६ साठी जिल्हा, विद्यापीठ, राज्यस्तरीय व इंदिरा गांधी राष्ट्रीय पुरस्कारासाठी विविध महाविद्यालयांकडून प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. उत्कृष्ट स्वयंसेवक/कार्यक्रम अधिकारी/महाविद्यालय यांच्यासाठी असे पुरस्कार राष्ट्रीय सेवा योजनेच्या रौप्यमहोत्सवी वर्षापासून विद्यापीठ, महाराष्ट्र शासन व केंद्रशासन यांचेकडून दिले जातात.

प्रस्ताव पाठविताना कृपया खालील गोष्टी लक्षात घ्याव्यात.

१) रासेयो एकक/स्वयंसेवक किंवा स्वयंसेविका/कार्यक्रम अधिकारी यांचा प्रस्ताव पाठविताना प्रत्येकी एकच प्रस्ताव विद्यापीठाकडे पाठविण्यात यावा. एका महाविद्यालयातून प्रत्येक प्रकारासाठी एकापेक्षा जास्त प्रस्ताव पाठविल्यास त्याचा विचार केला जाणार नाही.

२) प्रस्तावामध्ये खालील गोष्टींचा समावेश करावा :–

- अनुक्रमाणिका (Contents)
- इंग्रजी व मराठी नमुन्यातील अर्ज (Proforma in English and Marathi)
- मागील तीन वर्षाच्या नियमित कार्यक्रमांची माहिती (Information of Regular Activities)
- विशेष शिबिर कार्यक्रमांची माहिती (Spl. Camping)
- नाविन्यपूर्ण कार्यक्रमांची माहिती (Innovative Programme)
- इतर काही कार्यक्रमांची माहिती (Any Other Activities)
- प्रत्यक्ष कार्य करताना घेतलेली काही छायाचित्रे (Few Action Photo's)
- प्रमाणपत्र / प्रशंसापत्र (Certificates/Appreciation letters if any)

३) प्रस्तावाच्या मुखपृष्ठावरील मजकूर खालीलप्रमाणे असावा :–

- मराठी प्रस्तावासाठी : विद्यापीठ/राज्यस्तरीय राष्ट्रीय सेवा योजना पुरस्कारासाठीचा प्रस्ताव.
- स्वयंसेवक/कार्यक्रम अधिकारी/महाविद्यालय एकक नाव : ..........
- इंग्रजी प्रस्तावासाठी : १. Proposal for National Service Scheme Indira Gandhi National/State/University Level Awards.
  २. College/Programme Officer/Volunteer Name should appear.

४) सोबत जोडलेल्या प्रस्तावाच्या नमुन्यावरच माहिती भरून पाठवू नये. नमुना ए–४ कागदावर टंकलिखीत करून घ्यावा.

५) प्रस्तावामधील मजकूर टंकलिखीत केलेलाच असावा.

६) प्रस्ताव कोणत्याही परिस्थितीत ६० पानापेक्षा जास्त नसावा. तेव्हा प्रस्तावामध्ये फक्त महत्वाच्या व मागील तीन वर्षाच्या माहितीचा समावेश असावा.

७) नमुन्यामध्ये निर्धारित केलेल्या जागेवर संबंधीत अधिका–यांची स्वाक्षरी व शिक्का असावा.

८) प्रस्ताव मराठी (दोन प्रती) व इंग्रजी (दोन प्रती) सादर करावा.

९) वरील प्रस्ताव विद्यापीठाकडे पाठविताना ए–४ या आकाराच्या कागदावर माहिती एकत्रित करून ती बाईडिंग करून पाठवावी.

१०) कार्यक्रम अधिकारी/स्वयंसेवक/स्वयंसेविका यांनी प्रस्ताव पाठविताना प्रस्तावाच्या नमुन्यावर एक तिकिटाच्या आकाराचे रंगीत छायाचित्र व एक छायाचित्र अर्जासोबत पाकिटामध्ये बंद करून पाठवावे. दोन्ही प्रस्तावासोबत स्वंतत्रपणे दोन फोटो असावेत.

तरी वरील पुरस्कारासाठी प्रस्ताव विद्यापीठाकडे दिनांक १ जुलै २००६ पूर्वी पाठवावेत. अपूर्ण असलेले व अंतिम तारखेनंतर प्राप्त झालेले प्रस्ताव कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत.

आपला,

कार्यक्रम समन्वयक
राष्ट्रीय सेवा योजना

# राष्ट्रीय सेवा योजना पुरस्कारासाठी
## स्वयंसेवकांनी पाठवावयाच्या प्रस्तावाचा नमुना.

छायाचित्र

१) राज्य :

२) विद्यापीठाचे नाव :

३) महाविद्यालयाचे नाव व संपूर्ण पत्ता :
पिन कोड :
दुरध्वनी क्रमांक :

४) प्राचार्यांचे नाव :

५) पुरस्कारासाठी प्रस्तावित
रा.से.यो. स्वयंसेवकाचे नाव :

६) लिंग : पुरूष / स्त्री

७) स्वयंसेवकाचा निवासी पत्ता व दुरध्वनी :

पिन कोड :
दुरध्वनी क्रमांक :
मोबाईल (असल्यास) :
ईमेल (असल्यास) :

८) स्वयंसेवक म्हणून किती तास काम केले.

९) रा.से.यो. स्वयंसेवकांचा कालावधी :————————————— पासून ——————————— पर्यंत

१०) रा.से.यो. डायरी तयार केली आहे काय ? (स्वयंसेवक डायरी सोबत जोडावी)

११) किती विशेष शिबिरात सहभाग घेतला आहे? (सविस्तर तपशिल द्यावा)

१२) जिल्हा/विद्यापीठ/ राज्य/राष्ट्रीय स्तरावरील शिबिर/
कार्यक्रमात सहभाग घेतला आहे काय असल्यास, .
सविस्तर तपशिल जोडावा.

१३) रक्तदान, नेत्रदान, वृक्षारोपण, निसर्ग, साक्षरता, आरोग्य
शिक्षण, समाजोन्नती इ. कार्यक्रमातील सहभाग
(सविस्तर तपशिल जोडावा.)

१४) दत्तक घेतलेल्या वस्तीमध्ये लोकांना समाजसेवेसाठी प्रोत्साहित
करणारे कार्य व त्यासाठी दाखविलेले नेतृत्व.
(सविस्तर तपशिल जोडावा.)

१५) न्यायिक अथवा अन्य कुठल्याही प्रकारची चौकशी चालू आहे काय ? होय / नाही

१६) सर्वसाधारण अभिप्राय

१७) इतर उल्लेखनीय कामगिरी (सविस्तर तपशिल जोडावा.)

१८) पास झालेली परीक्षा (शेवटच्या परीक्षेचे मार्कशीट जोडावे.)

१९) स्वयंमुल्यमापन रा. से. योजनेतून आपण काय शिकलात ?
याचा वापर कसा होतो. सविस्तर लिहा.

२०) रा.से.यो. मध्ये आपण सूचविलेले / नाविन्यपूर्ण उपक्रमांची माहिती दयावी.

कार्यक्रम अधिकारी स्वाक्षरी स्वयंसेवक स्वाक्षरी

प्राचार्यांची स्वाक्षरी कार्यक्रम समन्वयकाची स्वाक्षरी

कुलगुरू यांची स्वाक्षरी राज्य संपर्क अधिकारी यांची स्वाक्षरी